संक्षिप्त

संयुक्त राष्ट्र उच्चस्तरीय सल्लागार मंडळावर जयती घोष

न्यूयॉर्क : भारतीय विकास अर्थशास्त्रज्ञ जयती घोष यांची संयुक्त राष्ट्रांच्या उच्चस्तरीय सल्लागार मंडळावर नेमणूक करण्यात आली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सरचिटणीसांना अर्थविषयक धोरणात्मक सल्ला देण्याचे काम हे मंडळ करीत असते. सध्याच्या काळात कोविड १९ पेचप्रसंगामुळे जगापुढे अनेक सामाजिक व आर्थिक आव्हाने असताना या मंडळावर मोठी जबाबदारी आहे. घोष (वय ६५) या ॲमहर्स्ट येथील मॅसॅच्युसेटस विद्यापीठात अर्थशास्त्राच्या प्राध्यापक असून त्यांनी पस्तीस वर्षाच्या कारकिर्दीत अनेक पुस्तके लिहिली आहेत.

पाकिस्तानात ५ दहशतवादी ठार

पेशावर : पाकिस्तानी सुरक्षा दलांनी देशाच्या अशांत अशा वायव्य प्रांतात राबवलेल्या गुप्त मोहिमांमध्ये तेहरीक-इ-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) या प्रतिबंधित संघटनेच्या दोन प्रमुख कमांडर्ससह ५ दहशतवादी ठार झाले. अफगाणिस्तान सीमेलगतच्या उत्तर वजिरिस्तान या आदिवासी जिल्ह्याच्या मीर अली व खैसुर भागांमध्ये या मोहिमा राबवण्यात आल्या, असे पाकिस्तानी लष्कराची माध्यम शाखा असलेल्या इंटर-सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्सने (आयएसपीआर) एका निवेदनात सांगिले.

चीनमधील खाणीत १० कामगारांचे मृतदेह

बीजिंग/ जिनान : चीनच्या शांडोंग प्रांतातील एका सोन्याच्या खाणीत स्फोट झाल्यानंतर तेथे अडकून पडलेल्या खाण कामगारांचा गेले दोन आठवडे शोध घेणाऱ्या चीनच्या बचाव पथकातील कामगारांना १० मृतदेह आढळले असल्याचे अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले. दोन आठवड्यांच्या शोधमोहिमेनंतर रविवारी खाणीत जमिनीखाली अडकून पडलेल्या ११ कामगारांची सुटका करण्यात आली होती.

मेक्सिकोच्या अध्यक्षांना करोनाची लागण

मेक्सिको सिटी : मेक्सिकोचे अध्यक्ष ॲण्ड्रेस मॅन्युअल लोपेझ ओब्राडोर यांनी आपल्याला करोनाची लागण झाल्याचे म्हटले आहे, मात्र करोनाची लक्षणे सौम्य स्वरूपाची आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. देशातील करोनाची स्थिती ओब्राडोर यांनी ज्या पद्धतीने हाताळली त्यावरून त्यांच्यावर जोरदार टीका करण्यात आली होती, आपल्यावर वैद्यकीय उपचार केले जात असल्याचे त्यांनी ट्वीट केले आहे.

दिल्लीत आज शेतकऱ्यांचेही 'पथसंचलन'

एकाच वेळी तीन ट्रॅक्टर मोर्चांद्वारे शक्तिप्रदर्शन

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : दिल्लीत राजपथावर प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या पथसंचलनाप्रमाणे मंगळवारी राजधानीच्या परिघावर शेतकऱ्यांचे 'पथसंचलन' होणार असून त्यांच्या ट्रॅक्टर मोर्चाकडे देशाचे लक्ष लागले आहे.

तीन वेगवेगळ्या ठिकाणांहून मार्गक्रमण करणाऱ्या मोर्चांत २.५ लाख ट्रॅक्टरसह ५ लाख शेतकरी सहभागी होतील, असा दावा संयुक्त किसान मोर्चाने केला असला तरी, मोर्चात फक्त ५ हजार ट्रॅक्टर व तितच्याच संख्येने आंदोलकांच्या सहभागाची परवानगी दिल्ली पोलिसांनी दिली आहे. तीनही मोर्चे दुपारी १२ ते संध्याकाळी ५ या वेळेत काढले जातील.

आठवड्याभरातील चर्चेच्या पाच फेऱ्यांनंतर दिल्ली पोलिसांनी शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टर मोर्चांना परवानगी दिली असली तरी या मोर्चांमध्ये घातपात होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी मोर्चांच्या मार्गांवर कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. सुरक्षेच्या कारणास्तव राजपथावरील पथसंचलन संपल्यानंतर शेतकऱ्यांचा ट्रॅक्टर मोर्चा सुरू होईल. या ट्रॅक्टर मोर्चासाठी दिल्लीच्या सीमांवरील सर्व अडथळे काढले जातील. त्यानिमित्ताने गेले दोन महिने दिल्लीच्या वेशींवर आंदोलन करणारे शेतकरी दिल्लीत प्रवेश करतील, अशी माहिती स्वराज इंडियाचे नेते योगेंद्र यादव यांनी दिली.

पोलिसांकडून दक्षता

दिल्लीच्या आऊटर रिंगरोडवरून मोर्चा काढण्यास परवानगी देण्याची मागणी शेतकरी संघटनांनी केली होती मात्र, दिल्ली पोलिसांनी ती नाकारली. 'शेतकरी नेत्यांच्या सहमतीने ट्रॅक्टर मोर्चासाठी तीन मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. काही देशविघातक घटक या मोर्चाला धोका पोहोचवू शकतात. त्यामुळे दक्ष राहण्याची गरज आहे', असे दिल्लीचे पोलिस आयुक्त एस. एन. श्रीवास्तव यांनी सोमवारी शेतकरी नेत्यांशी झालेल्या चर्चेनंतर पत्रकारांना सांगितले. पाकिस्तानात १३ ते १८ जानेवारी या पाच दिवसांत ३०० ट्विटर खाती तयार करण्यात आली असून समाजमाध्यमांच्या आधारे अफवा पसरवून ट्रॅक्टर मोर्चामध्ये अडथळे निर्माण करण्याचाही प्रयत्न केला जाऊ शकतो, अशी माहिती 'आयबी' युनिटचे आयुक्त दिपेंदर पाठक यांनी दिली.

जय्यत तयारी

शेतकरी संघटनांनी ट्रॅक्टर मोर्चाची जय्यत तयारी केली असून सिंघू, टिकरी व गाझीपूर या तीन आंदोलनस्थळावरून तीन ट्रॅक्टर मोर्चे निघतील. या तीनही मोर्चांचे मार्ग ठरवण्यात आले असून ते प्रत्येकी ६२ ते ६८ किमी अंतर पार करून आंदोलनाच्या मूळ ठिकाणी परत जातील. या मार्गांवर ट्रॅक्टर संचलनाचे पूर्ण नियोजन करण्यात आले असून सुमारे ३ हजार स्वयंसेवक मदतीसाठी शेतकरी संघटनांच्या वतीने तैनात केले जातील. प्रत्येक ट्रॅक्टरवर जास्तीत जास्त पाच व्यक्ती असतील. त्यांनी चोवीस तासांसाठी शिदोरी घेऊन येण्याची सूचना केली आहे. मद्य बाळगण्यास व सेवनास मनाई केली असून मोठे फलक नेण्याचीही परवानगी नसेल. प्रत्येक मोर्चासाठी शेतकरी संघटनांकडून स्वतंत्र व्यवस्थापन यंत्रणा उभारण्यात आली आहे. त्यात ४० सदस्य असून डॉक्टर, सुरक्षा रक्षक, समाजमाध्यम व्यवस्थापक यांचा समावेश असेल. ४० रुग्णवाहिन्यांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. मोर्चांचे नेतृत्व शेतकरी नेते करणार असून त्यांच्या मागून ट्रॅक्टर मोर्चा निघेल. ट्रॅक्टरवर तिरंगा असेल, लोकगीते आणि देशभक्ती गीते वाजवली जातील. पंजाब, हरियाणा तसेच, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तराखंड अशा विविध राज्यांतून शेतकरी ट्रॅक्टर मोर्चात सहभागी होणार असल्याची माहिती संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने देण्यात आली.

तोडगा निघेल-तोमर

प्रजासत्ताक दिनी ट्रॅक्टर मोर्चा काढण्याच्या शेतकऱ्यांच्या निर्धारावर केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्र तोमर यांनी नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांना दुसऱ्या कुठल्याही दिवशी ट्रॅक्टर मोर्चा काढता आला असता, पण, त्यांनी २६ जानेवारीला मोर्चा काढण्याची घोषणा केली. मोर्चा शांततेत पार पडणे हे दिल्ली पोलिसांसाठी तसेच, शेतकऱ्यांसाठी देखील आव्हान असेल, असे तोमर म्हणाले. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लवकर तोडगा निघेल व आंदोलन संपुष्टात येईल, अशी आशाही तोमर यांनी व्यक्त केली.

ट्रॅक्टर मोर्चा अत्यंत शांततेत काढला जाईल व राजपथावरील पथसंचलनाला कोणताही बाधा पोहोचवली जाणार नाही, असे शेतकरी नेत्यांनी यापूर्वीच स्पष्ट केले आहे. प्रजासत्ताक दिनी होणारा शेतकऱ्यांचा मोर्चा हा केंद्र सरकारविरोधात आंदोलक शेतकऱ्यांचे शक्तिप्रदर्शन असल्याचे मानले जात आहे.

महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांची धडक

राजपथावरील पथसंचलनाप्रमाणे या ट्रॅक्टर मोर्चातही विविध राज्यांतील सांस्कृतिक रथ-देखावेही पाहायला मिळतील. महाराष्ट्रातून जळगांव, नंदूरबार, औरंगाबाद जिल्ह्यांतून लोकसंघर्ष मोर्चाचे सुमारे सहाशे महिला व साडेचारशे पुरूष कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले आहेत. सिंघू, टिकरी आणि गाझीपूरच्या सीमेवर भेट देऊन सातपुड्यातील या आदिवासी महिलांनी आंदोलकांना पाठिंबा दिला आहे. त्या आदिवासी संस्कृतीची झलक दाखवत शेतकऱ्यांच्या प्रजासत्ताक परडेमध्ये ऐतिहासिक सहभाग नोंदवतील, अशी माहिती लोकसंघर्ष मोर्चाच्या प्रतिभा शिंदे यांनी दिली.

संसदेवर १ फेब्रुवारीला मोर्चा

नवे शेती कायदे रद्द करावेत व किमान आधारभूत मूल्याला कायद्याची हमी द्यावी यासाठी शेतकरी आंदोलन करत असून १ फेब्रुवारी रोजी संसदेवर धडक मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती संयुक्त किसान मोर्चाचे सदस्य व क्रांतीकारी किसान युनियनचे अध्यक्ष दर्शनपाल यांनी सोमवारी दिली. शेतकरी संघटना व केंद्र सरकार यांच्यात झालेल्या चर्चेच्या ११ फेऱ्या निष्फळ ठरल्या आहेत. शुक्रवारी २९ जानेवारीपासून संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत असून १ फेब्रुवारीला अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे.

लशींबाबत अफवा पसरवल्यास कारवाई; केंद्राची राज्यांना सूचना

पीटीआय, नवी दिल्ली

कोविड-१९ लशींच्या परिणामकारकतेबाबत अफवा पसरवल्या जात असल्याच्या समस्येला तोंड देणाऱ्या केंद्र सरकारने राज्यांना अशा चुकीच्या माहितीचा प्रसार रोखण्यास सांगितले असून, अशा प्रकारे चुकीची व अपुरी माहिती पसरवणाऱ्या लोकांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्याचा सल्ला दिला आहे.

सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने तयार केलेली कोव्हिशील्ड आणि भारत बायोटेकने तयार केलेली कोव्हॅक्सिन या दोन्ही लशी सुरक्षित आणि प्रतिकारक्षम असल्याचे राष्ट्रीय नियामक प्राधिकरणाला आढळले आहे, असे केंद्रीय गृहसचिव अजय भल्ला यांनी सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पाठवलेल्या पत्रात आवर्जून नमूद केले आहे.

केंद्र सरकारने राज्य सरकारे व केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनाशी समन्वय साधून १६ जानेवारीपासून या दोन लशींसह देशभरात कोविड-१९ लसीकरणाची मोहीम सुरू केली आहे.

कोविड-१९ लशीबाबतच्या राष्ट्रीय तज्ज्ञ गटाने (एनईजीव्हीएसी) ठरवून दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार आरोग्य कर्मचारी व करोनायोद्धे यांचे लसीकरण केले जात असून, त्यानंतर दुसऱ्या व तिसऱ्या प्राधान्य गटातील लोकांना लस दिली जाईल, असे भल्ला यांनी सांगितले.

सुरक्षिततेची ग्वाही

'देशात उत्पादित लसी सुरक्षित असल्याचे आढळले आहे. तथापि समाजमाध्यमांवर त्यांच्याबाबत निराधार व दिशाभूल करणाऱ्या अफवा पसरवण्यात येत असल्यामुळे त्यांची सुरक्षितता व परिणामकारकता याबाबत संभ्रम निर्माण होत आहे. हितसंबंधी लोकांमार्फत पसरवल्या जाणाऱ्या अशा अफवांमुळे लोकांमध्ये अनावश्यक शंका पसरू शकतात. त्यामुळे या अफवांना आळा घालण्याची आवश्यकता आहे', असे भल्ला यांनी पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे.

देशात करोना मृत्यूंत घट

नवी दिल्ली : देशात गेल्या २४ तासांत करोनामुळे मरण पावलेल्यांची संख्या सोमवारी १३१ इतकी नोंदली गेली असून दैनंदिन मृत्यूंच्या नोंदीचा आठ महिन्यांतील हा सर्वात कमी आकडा असल्याचे आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे. १७ मे पासूनची ही सर्वात कमी मृत्यूसंख्या असून त्या दिवशी मृतांची संख्या ही १२० होती. एकूण रुग्णांची संख्या आता १,०६,६७,७३६ झाली असून १३,२०३ नवीन रुग्ण सापडले आहेत. १,८४,१८२ रुग्णांवर उपचार सुरू असून हे प्रमाण एकूण संसर्गाच्या १.७३ टक्के आहे. लागोपाठ सहाव्या दिवशी हे प्रमाण दोन लाखांच्या खाली राहिले आहे. आतापर्यंत १,०३,३०,०८४ लोक बरे झाले असून रुग्ण बरे होण्याचा दर आता ९६.८३ टक्के आहे. मृत्यू दर १.४ टक्के झाला असून १३१ नवीन मृतात महाराष्ट्रात ४५, केरळात २०, दिल्लीत ९, छत्तीसगड, पश्चिम बंगाल व उत्तर प्रदेशात प्रत्येकी ८ या प्रमाणे रुग्णांचे प्रमाण आहे. देशात आतापर्यंत १ लाख ५३ हजार ४७० जणांचा मृत्यू झाला असून त्यात महाराष्ट्र ५०,७८५, तमिळनाडू १२,३१६, कर्नाटक १२,१९७, दिल्ली १०,८०८, पश्चिम बंगाल १०,११५, उत्तर प्रदेश ८,६१७, आंध्र प्रदेश ७,१४७ असे प्रमाण आहे. भारतीय वैद्यक संशोधन परिषदेने दिलेल्या माहितीनुसार १९.२३ कोटी जणांच्या चाचण्या करण्यात आल्या असून रविवारी ५ लाख ७० हजार २४६ चाचण्या करण्यात आल्या. एकूण मृत्यूंमध्ये सह आजाराने मरण पावलेल्यांचे प्रमाण सत्तर टक्के असल्याचे आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे.

झायडस कॅडिलाच्या औषध चाचण्या यशस्वी

नवी दिल्ली : झायडस कॅडिला कंपनीने तयार केलेल्या डेसिड्युस्टॅट या कोविड विषाणूवरील औषधाच्या चाचण्यांचे निष्कर्ष सकारात्मक आले आहेत. मेक्सिकोत या चाचण्या करण्यात आल्या असून त्याच्या दोन टप्प्यातील चाचण्यांची पूर्तता झाल्याचे सांगण्यात येते. जून २०२० मध्ये झायडस कॅडिलाच्या औषधाला मेक्सिकोतील कोफेप्रिस या औषध नियामक प्राधिकरणाने चाचण्यांना परवानगी दिली होती. त्यातील दुसऱ्या टप्प्यातील अभ्यासाचे निष्कर्ष हाती आले आहेत. झायडस कॅडीला ही कॅडिला हेल्थकेअर समूहातील कंपनी असून कंपनीने म्हटले आहे, की काही कोविड रुग्णात 'हायपोक्सिया'ने अवयव विकलांग होण्याच्या व मृत्यूच्या घटना विषाणूरोधक औषधे देऊनही घडत होत्या. नवीन औषधाच्या चाचण्यात हे विपरीत परिणाम रोखण्यात यश आले असून त्यात रुग्णाला व्हेन्टिलेटरवरही ठेवण्याची वेळ येणार नाही. नवीन औषधाने तांबड्या रक्तपेशी वाढून उतींमधील ऑक्सिजनची पातळीही वाढते. यात रुग्णालयात दाखल केलेल्या व्यक्तींना व्हेंटिलेटरवर ठेवण्याची वेळ आली नाही. इतर औषधे घेत असलेल्या रुग्णात २५ टक्के लोकांना व्हेंटिलेटरवर ठेवण्याची वेळ आली.

भारत-चीन दरम्यान सैन्य माघारीबाबत चर्चा

पीटीआय, नवी दिल्ली

भारत व चीन यांच्यातील लष्करी चर्चेची नववी फेरी सुमारे १६ तास चालली. यात पूर्व लडाखमधील संघर्षाच्या ठिकाणांवरून सैन्य माघारी घेण्याबाबत चर्चा करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी सोमवारी दिली. मात्र चर्चेतून काय निष्पन्न झाले, हे अद्याप कळू शकलेले नाही.

कॉर्प्स कमांडर स्तरावरील ही चर्चा रविवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास सुरू होऊन मध्यरात्री अडीचच्या सुमारास संपली. पूर्व लडाखमधील प्रत्यक्ष ताबा रेषेवरील चीनच्या हद्दीत असलेल्या मोल्दो सीमेवर ही चर्चा पार पडली. भारतीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व लेह येथील १४ कॉर्प्सचे कमांडर लेफ्टनंट जनरल पीजीके मेनन यांनी केले.

या भागातील संघर्ष स्थळांवरून फौजा माघारी घेणे आणि तणाव कमी करणे या गोष्टी चीनवर अवलंबून आहेत, यावर भर दिल्याचे या चर्चेशी संबंधित सूत्रांनी सांगितले. सैन्य माघारी घेण्याची प्रक्रिया संघर्षाच्या सर्वच ठिकाणांवरून एकाच वेळी सुरू व्हायला हवी, असे भारताचे म्हणणे आहे. भारत व चीन यांचे सुमारे १ लाख सैनिक पूर्व लडाखमध्ये तैनात आहेत. दोन्ही बाजू आपल्या भूमीवर ठामपणे उभ्या असून दीर्घकाळ येथे राहण्याची तयारी दाखवत आहेत. या परिस्थितीवर सलोख्याने तोडगा काढण्यासाठी दोन्ही देशांची राजनैतिक व लष्करी मार्गाने चर्चाही सुरू आहे.

अर्णबला माहिती देणारे मोदीच- राहुल गांधी

करूर : २०१९ साली पाकिस्तानातील बालाकोटवर भारताने केलेल्या हवाई हल्ल्यांची पूर्वसूचना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामार्फतच रिपब्लिक टीव्हीचे प्रमुख संपादक अर्णब गोस्वामी यांच्यापर्यंत पोहोचवण्यात आली, असा आरोप काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी सोमवारी केला.आपल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ राहुल गांधी यांनी कुठलाही पुरावा मात्र दिला नाही. पंतप्रधान कार्यालयाने या निराधार दाव्यावर तत्काळ कुठलीही प्रतिक्रिया दिली नाही. पंतप्रधान आणि संरक्षणमंत्री यांच्यासह केवळ पाच जणांना या नियोजित हल्ल्याबाबत आधीच माहिती असू शकत होती.

सेंचूरी एन्का लिमिटेड
सीआयएन : एल२४३०४पीएन१९६५पीएलसी१३९०७५
नोंदणीकृत कार्यालय : प्लॉट नं. ७२ व ७२-ए, एमआयडीसी, भोसरी, पुणे-४११ ०२६.
टेलि : ०२०-६६१२७३००, फॅक्स : ०२०-२७१२०११३
वेबसाईट : www.centuryenka.com
ईमेल आयडी : cel.investor@birlacentury.com

सूचना

सिक्युरिटिज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४७ यासह वाचलेल्या रेग्युलेशन २९ च्या अनुसार याद्वारा सूचना देण्यात येते की ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाहीकरिता अलेखापरिक्षित वित्तिय विवरणे विचारात घेणे, मान्य करणे आणि रेकॉर्डवर घेणे याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची सभा मंगळवार, ०२ फेब्रुवारी, २०२१ रोजी घेण्यात येणार आहे. याबाबत माहिती www.bseindia.com या बीएसई लिमिटेडच्या वेबसाईटवर, www.nseindia.com या दि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाईटवर आणि www.centuryenka.com या कंपनीच्या वेबसाईटवरसुद्धा उपलब्ध आहे.

सेंचूरी एन्का लिमिटेड करिता
स्थळ : मुंबई — राहुल दुबे
तारीख : २५.०१.२०२१ — कंपनी सचिव

दीपक फर्टिलायझर्स ॲण्ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: साई हिरा, सर्वे नं. ९३, मुंढवा, पुणे ४११ ०३६.
फोन: +९१ २० ६६४५ ८०००
ईमेल: investorgrievance@dfpcl.com
वेबसाईट : www.dfpcl.com
CIN: L24121MH1979PLC021360

सुचना

सेबी (लिस्टींग ऑब्लीगेशनस् ॲण्ड डिसक्लोजर रिकवायरमेंट) रेग्युलेशनस, २०१५ च्या नियम ४७ (१) च्या अन्वये अशी सुचना देण्यात येते आहे की, **दि. ३१ डिसेंबर, २०२०** रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊमाही कालावधीचे अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष इतर बाबींसह विचारात घेण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची सभा **बुधवार** दि. **३ फेब्रुवारी, २०२१** रोजी होणार आहे.

नियम ४७ च्या अन्वये असे सुद्धा सुचित करण्यात येते की ही सूचना खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे:
अ. कंपनीचे संकेतस्थळ **(www.dfpcl.com)**;
ब. बी एस ई लिमिटेड **(www.bseindia.com)** आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड **(www.nseindia.com)**

दीपक फर्टिलायझर्स ॲण्ड पेट्रोकेमिकल्स् कॉर्पोरेशन लिमिटेड करीता
सही
गौरव मुनोळी
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
ठिकाण: पुणे
दिनांक: २५ जानेवारी, २०२१

KIRLOSKAR INDUSTRIES LIMITED
A Kirloskar Group Company
Registered Office: Office No. 801, 8th Floor, Cello Platina, Fergusson College Road, Shivajinagar, Pune 411 005
CIN: L70100PN1978PLC088972
Enriching Lives

NOTICE

Notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company will be held on Friday, 5 February 2021, *inter alia*, to consider and take on record Standalone and Consolidated Un-audited Financial Results for the quarter ended 31 December 2020.

This intimation is also available on the Company's website at www.kil.net.in and on Stock Exchange(s) websites at www.bseindia.com and www.nseindia.com.

By Order of the Board of Directors
For **KIRLOSKAR INDUSTRIES LIMITED**
Sd/-
Ashwini Mali
Company Secretary and Compliance Officer
Place : Pune
Date : 25 January 2021

• Tel: +91 20 2970 4374 • Fax: +91 20 2970 4374
• Email: investorrelations@kirloskar.com • Website: www.kil.net.in
"Mark bearing word 'Kirloskar' in any form as a suffix or prefix is owned by Kirloskar Proprietary Limited and Kirloskar Industries Limited is the Permitted User"

हनीवेल
हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमिटेड
सीआयएन : एल२९२९९पीएन१९८४पीएलसी०१७९५१
फोन : +९१ २० ७११४ ८८८८

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४७(१)च्या अनुसार याद्वारा सूचना देण्यात येते की, ३१ डिसेंबर २०२० रोजी संपलेल्या तिमाहीकरिता मर्यादित परीक्षण अहवालासह कंपनीचे अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष, इतर गोष्टींसमवेत, विचारात घेण्याकरिता व मान्य करण्याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची सभा गुरुवार, ०४ फेब्रुवारी २०२१ रोजी घेण्याचे निर्धारित करण्यात आले आहे.

या सूचनेमधील समाविष्ट माहिती **https://www.honeywell.com/en-us/global/en-in/hail** या कंपनीच्या वेबसाइटवर आणि **www.bseindia.com** व **www.nseindia.com** या स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाइट्सवरसुद्धा उपलब्ध आहे.

हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमिटेडकरिता
स्थळ : पुणे — **फराह इराणी**
तारीख : २६ जानेवारी २०२१ — कंपनी सचिव

नोंदणीकृत कार्यालय: ५६ व ५७, हडपसर इंडस्ट्रियल इस्टेट, पुणे-४११ ०१३
ईमेल : HAIL.investorservices@honeywell.com
वेबसाइट : https://www.honeywell.com/en-us/global/en-in/hail

KIRLOSKAR OIL ENGINES LIMITED
A Kirloskar Group Company
Registered Office : Laxmanrao Kirloskar Road, Khadki, Pune - 411003.
CIN : L29100PN2009PLC133351
Enriching Lives

Notice

Notice is hereby given that the meeting of Board of Directors will be held on 5th February 2021, *inter alia*, to consider and approve Standalone and Consolidated Un-audited Financial Results for the quarter and nine months ended 31st December 2020.

This notice is also available on the Company's website at www.koel.co.in and on Stock Exchange(s) website at www.bseindia.com and www.nseindia.com.

By the Order of the Board of Directors
For **KIRLOSKAR OIL ENGINES LIMITED**
Sd/-
SMITA RAICHURKAR
Company Secretary
Place : Pune
Date : 25th January 2021

•Tel: +91 20 25810341 • Fax: +91 20 25813208
• Email: investors@kirloskar.com • Website: www.koel.co.in
"Mark bearing word 'Kirloskar' in any form as a suffix or prefix is owned by Kirloskar Proprietary Ltd. and Kirloskar Oil Engines Ltd. is the Permitted User"

वक्ते :
गिरीश कुबेर, संपादक, लोकसत्ता
मंगेश सोमण, प्रसिद्ध अर्थविश्लेषक

अर्थसंकल्पापूर्वीचे विश्लेषण
कधी : गुरुवार, २८ जानेवारी २०२१
वेळ : सायंकाळी ६ वाजता

लोकसत्ता विश्लेषण
सहप्रायोजक
Punit Balan Group
लोकमान्य मल्टिपर्पस को-ऑप. सोसायटी लि.
* नियम व अटी लागू. प्रवेश मर्यादित

पॉवर्ड बाय storytel
www.storytel.com/marathi

सहभागासाठी तुम्ही करायचं ते इतकंच...
• http://tiny.cc/Ls_BudgetVishleshan_2021 या लिंकवर जाऊन नोंदणी करा. • नोंदणी करून झाल्यावर आमच्याकडून तुम्हाला ई-मेल आयडीवर संदेश येईल. • याद्वारे २८ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता या वेब-संवादात सहभागी होता येईल. • अधिक माहितीसाठी http://www.loksatta.com या संकेतस्थळाला भेट द्या.